**विशेष दिवाणी दावा क्र. १/२०१८ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश.**

१. वादीने प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव, वाटप व स्वतंत्र कब्जासाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये नि. ५ वरील अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेविरुध्द दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीची त्रयस्थ इसमांना विक्री अगर गहान, दान, बक्षीस इतर अन्य मार्गाने हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे.

२. वादीचे कथन की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलार्जित मालकीची मिळकत असून अद्याप सदर मिळकतीचे सरसनिरस मनाने वाटप झालेले नाही. वादीने दाव्यामध्ये परिच्छेद क्र. २ मध्ये वदी व प्रतिवादी यांची वंशावळ दिलेली आहे. वादीचे पुढे कथन की, वादी व प्रतिवादी यांचे पुर्वज गणपत तसेच त्यांची मुले रंगनाथ, एकनाथ व माधव हे श्रीगोंदा शहराबाहेर राहत असल्याने दावा मिळतीचा सिटी सर्वे ऑफीसर यांनी सर्वे केला तेंव्हा जबाब देण्यास कोणीही हजर नसल्याने महाराष्ट्र शासन, सय्यद इब्राहिम, पापाभाई व इतरांची चुकीच्या नावाची नोंद केली. वादीचे पुढे कथन की, दावा मिळकतीचे ग्रामपंचायत दप्तरी वादी व प्रतिवादी यांचे पुर्वजाचे नावाची नोंद आहे. वादीचे पुढे कथन की, सदर बाब त्यांचे लक्षात आल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे अपील अर्ज क्र. १०४४/२०१२ हे सिटी सर्वे नं. २०४२ व २०४३ बाबत तसेच अपील अर्ज क्र. १५१२/१४ हे सिटी सर्वे नं. २०४१ बाबत दाखल केले त्यामध्ये सदर मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या वडीलार्जित मिळकती असल्याचे दिसून आल्याने तशी सिटी सर्वे नंबरला नोंद घेण्याबाबत आदेश झाले. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी यांनी सदर कारवाईबाबत वादी यांना सामिल करुन न घेतल्यामुळे वादीने जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अहमदनगर यांचेकडे अपील एमआर नं. १६४/२०१४ दाखल केले, परंतु दिनांक ३०/०१/२०१५ रोजी त्यांचे अपील फेटाळण्यात आले, कारण त्याच कोर्टाने पुर्वी अपील नं. १०४४/२०१२ चा निर्णय दिलेला होता. वादीचे पुढे कथन की, म्हणून त्यांनी उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक यांचेकडे द्वितीय अपील नं. २३६/२०१५ दाखल केले, सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी हे हजर झाले व वादी ही हरिभाऊ यांची मुलगी नसून दावा मिळकतीबाबत वादीचा काहीही हितसंबंध नाही असे कथन केले. वादीचे पुढे कथन की, वादीने ती हरीभाऊ यांची वारस असल्याचे प्रमाणपत्र तसेच हरिभाउ यांचे मृत्यूनंतर १९७९ साली ग्रामपंचायत असेसमेंटच्या यादीला नाव घेतले नाही या बाबत पुरावा दिला नाही म्हणुन दिनांक २३/०१/२०१७ रोजी द्वितीय अपील फेटाळण्यात आले. वादीचे पुढे कथन की,

प्रतिवादी हे वादी यांचा दावा मिळकतीतील १/३ हिस्सा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत, तसेच वादीने तिचा हिस्सा मागितला असता प्रतिवादीने नाकारला म्हणून प्रस्तुत दावा तसेच नि. ५ वरील अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी यांनी नि. १५ वर त्यांचे म्हणणे व कैफीयत देवून दाव्यातील व अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांचे पुढे कथन की, दावा हा कायदेशीर व बरोबर नसून मुदतीमध्ये दाखल केलेला नाही. प्रतिवादीचे पुढे असे कथन की, दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार समावेश केले नाहीत तसेच दाव्यातील दावाा मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. तसेच वादीने योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही म्हणून वादीचा दावा व नि. ५ वरील अर्ज कायद्याने चालु शकत नाही. त्यांचे पुढे कथन की, वादीचे वडीलांना सन १९५९ सालीच त्यांचे वडीलोपार्जित सर्व मिळकतीमध्ये वाटप करुन दिलेले होते व त्याप्रमाणे वादीचे नावाच्या गावदप्तरी मालकीहक्काने नोंदी झाल्या होत्या. त्यांचे पुढे कथन की, वादीचे वडीलाने त्यांना वाटणीमध्ये मिळालेल्या सर्व मिळकती विक्री केल्या असून उर्वरित मिळकती वादीचे वडीलांचे वारसांना वादीचे वडीलाचे मृत्यूनंतर विक्री केल्या आहेत. त्यांचे पुढे कथन की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली घरजागा ही प्रतिवादी यांची स्वतंत्र मालकीहक्क व वहिवाटीची असून त्यामध्ये वादी यांचा कोणताही हितसंबंध नाही. त्यांचे पुढे कथन की, वादी यांच्या वडीलांचा सदर मिळकतीमध्ये हक्क असता तर वादी यांच्या वडीलाने दिनांक ०९/०८/१९५९ नंतर दोनवेळा फेरवाटप झाले त्यावेळी हरकत घेतली असती. त्यांचे पुढे कथन की, दावा मिळकतीमध्ये वादी यांचा हक्क असता तर वादीने वारस म्हणून त्यांचे नावाची नोंद सदर मिळकतीस केली असती. त्यांचे पुढे कथन की, दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत नसून त्यांची स्वतंत्र मालकीची असल्याने वादी यांना त्यामध्ये कोणताही हक्क व हितसंबंध नाही. त्यांचे पुढे कथन की, वादी ही प्रतिवादी यांचेवर दबाव टाकुन पैसे उकाळण्याचा हेतू आहे म्हणून प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. त्यांचे पुढे कथन की, वादी यांच्या तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये काहीही तथ्य नसून तो खर्चासह रद्द करण्यात यावा.

५. वादी व प्रतिवादी यांचे कथनांचा विचार करता प्रकरणाच्या अंतिम निष्कर्षापर्यंत येण्यासाठी खालील वादप्रश्न मांडण्यात आले, ते वादप्रश्न त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे का ? | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | वादीने न्यायाचा तराजु त्यांच्या बाजुने असल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नकारार्थी |
| ३. | वादीला तुर्तातूर्त मनाई नाकारल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे का ? | ...नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | ...अंतिम आदेशानुसार |

**:: कारणमिमांसा ::**

६. तुर्तातुर्त मनाईची मागणी मिळण्यासाठी वादीने सकृतदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे सिध्द करावे लागते. याशिवाय तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार असून न्यायाचा तराजु हा देखील त्यांच्याच बाजुने असल्याचे सिध्द करावे लागते. सदरील तिनही बाबी सिध्द केल्यातर वादी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरतो. याठिकाणी महत्वाचे नमूद करावयाची बाब म्हणजे सकृतदर्शनी केस म्हणजे जिचा गुणदोषावर निर्णय होणे गरजेचे आहे अशी केस असावी लागते. याशिवाय न्यायाचा तराजु हे कोणाचे नुकसान जास्त होणार आहे यावर ठरला जातो.

**वादप्रश्न क्र.१ करिता :-**

७. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचे व त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव, वाटप व स्वतंत्र कब्जासाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. वादी हिचे कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वडीलोपार्जित असून त्यामध्ये वादी हिचा १/३ अविभक्त हिस्सा आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत ही त्यांची स्वतंत्र मालकीची असून त्याचेशी वादी हिचा काहीही संबंध नाही. वादीचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीची सिटी सर्वे कार्यालयाचे अधिका-याने सर्वे केला त्यावेळी जाब देणेसाठी कोणीही उपलब्ध नसल्याने सदर मिळकतीस महाराष्ट्र शासन व सय्यद बाबुलाल अशी नावे लागली म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी अधिक्षक, भूमी अभिलेख अहमदनगर यांचेकडे अपील क्रं. १०४४/२०१२ व ५११२/२०१४ ही अपीले अनुक्रमे मिळकत सर्वे नं. २०४२, २०४३ व २०४१ या मिळकतीबाबत दाखल केले होते. वादीने सदर अपील क्रं. १०४४/२०१२ ची प्रत निशाणी ३ वर अनुक्रमांक ७ वर दाखल केली आहे. सदर प्रतीचे अवलोकन करता सदर अपीलाचा निकाल दिनांक ३०/०६/२०१२ रोजी होवून सिटी सर्वे नं. २०४२ व २०४३ या मिळकतींमध्ये १अ, १ब यांना अर्धा हिस्सा व २अ ते २ड यांना अर्धा हिस्सा

म्हणजंच एकनाथ ढवाण व माधव ढवाण यांचे वारसांना प्रत्येकी अर्धा हिस्सा देण्या बाबत आदेश पारित करण्यात आला. सदर आदेशाच्या आधारे प्रतिवादी यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीस करण्यात आली. वादीने सि. स. नं. २०४१, २०४२ व २०४३ च्या उता-याच्या प्रमाणीत प्रती न्यायालयात निशाणी ३ वर अनुक्रमांक ३ ते ५ वर दाखल केल्या आहेत. सदर उता-याचे अवलोकन करता प्रतिवादी यांचे नावाची नोंद सदर मिळकतीस झाल्याचे दिसुन येते. दावा मिळकतीचे ग्रामपंचायत दप्तरी वादी व प्रतिवादी यांचे पुर्वजाचे नावाची नोंद आहे व दावा मिळकती हया वडीलोपार्जित आहेत असे वादीने कथन केले होते परंतु हे दाखविण्यासाठी तिच्या तोंडी कथनाव्यतीरिक्त दुसरा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. वादीने सदर नोंदी बाबत उतारे दाखल करणे आवश्यक होते.

८. प्रतिवादी यांनी दावा मिळकत ही त्यांची स्वतंत्र मालकी हक्काची असल्याचे कथन केलेले आहे, परंतु त्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकतीच्या सन १९५९ सालीच त्यांचे वडीलोपार्जित सर्व मिळकतीमध्ये वाटप करुन वादीचे वडीलांना दिलेले होते व त्याप्रमाणे वादीचे नाव गावदप्तरी मालकीहक्काने नोंदी झाल्या होत्या परंतु वादीचे वडीलाने त्यांना वाटणीमध्ये मिळालेल्या सर्व मिळकती विक्री केल्या असून उर्वरित मिळकती वादीचे वडीलांचे वारसांना वादीचे वडीलाचे मृत्यूनंतर विक्री केल्या आहेत. प्रतिवादींनी त्याबाबत तोंडी पुराव्याव्यतीरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की वादी यांच्या वडीलांचा सदर मिळकतीमध्ये हक्क असता तर वादी यांच्या वडीलाने दिनांक ०९/०८/१९५९ नंतर दोनवेळा फेरवाटप झाले त्यावेळी हरकत घेतली असती. तसेच श्रीगोंदा नगरपरिषद यांनी दिलेल्या दिनांक २७/०३/२०१७ रोजीच्या निशाणी ३ वरील अनुक्रमांक ६ वरील उता-याचे अवलोकन करता, तो सन २०१६-१७ या वर्षाचा असून सदर मिळकतीचे मालकसदरी दादाराम ढवण यांचे नाव असल्याचे दिसून येते. दावा मिळकतीस प्रतिवादी यांचे नावाची नोंद अपील अर्ज क्र. १५१२/१४ मधील दिनांक १४/०१/२०१४ रोजीच्या आदेशान्वये लागलेली आहे. सदर दस्तांचे अवलोकन करता, वादी हिचे वडील हरिभाउ किंवा वादीचे आजोबा रंगनाथ यांचे नावाची नोंद दावा मिळकतीस झाल्याचे दिसून येत नाही. दावा मिळकत ही वडीलोपार्जित किंवा एकत्र हिंदू कुटूंबाची मिळकत आहे असे वादीने प्रथमदर्शनी कोणताही पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. म्हणून वादी यांनी प्रथमदर्शनी केस त्यांचे बाजुने असल्याचे सिध्द केले नाही असे माझे मत झाले आहे. सबब, वादीने सकृतदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे दर्शवून दिलेले नाही. त्यामुळे **वादप्रश्न क्र.१** चा

निष्कर्ष **नकारार्थी** देण्यात येत आहे.

**वादप्रश्न क्र.२ व ३ करीता**

९. वर नमुद बार्बीचा विचार करता न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले नाही. दावा मिळकत ही वडीलोपार्जित आहे असा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही म्हणून नि. ५ वरील अर्ज नामंजूर केला तर वादी हीचे कोणतेही नुकसान होणार नाही परंतु अर्ज मंजुर केला तर प्रतिवादी यांचे जास्त नुकसान होईल कारण त्यांना त्यांची मिळकत विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही. त्यामुळे **वादप्रश्न क्र.२ व ३** चा निष्कर्ष **नकारार्थी** देण्यात येतो.

**वादप्रश्न क्र.४ करीता**

१०. वादीने वर नमूद केल्यानुसार तिनही मुद्दे त्यांच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे निश्चितच वादी तुर्तातुर्त मनाईची मागणी मिळविण्यासाठी अपात्र ठरतात. सबब वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नसून वादप्रश्न क्र.४ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. वादीचा निशाणी क्र. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.
२. सदरील अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात आदेश पारित करुन घोषीत करण्यात आला.)

श्रीगोंदा.
दिनांक : २८/११/२०१९.

**( संग्राम एस. शिंदे )**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.